# संगणक शास्त्राच्या विद्यार्थ्यांकडून सायबर सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन



**भाळवणी :** क्लिक हिल फाउंडेशन व आळे येथील बाळासाहेब जाधव महाविद्यालयाच्या विद्यमाने संगणकशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी सायबर जागरुकता अभियानांतर्गत पारनेर - नगर विधानसभा मतदारसंघातील जनतेची सेवा करणारे आ. निलेश लंके व भाळवणी येथील श्री नागेश्वर महिला ग्रामसंघातील महिलांना सायबर सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन केले.

पारनेर येथील आ. निलेश लंके, श्री नागेश्वर महिला ग्रामसंघाचे पदाधिकारी तसेच सीआरपी अलका कदम व परिसरातील महिलांना जयश्री भोसले, मिसबाह इनामदार, रोहन गायकवाड, रोहन टाकळकर यांनी सायबर गुन्हे, ओटीपी, कर्ज, बँकेतील व्यवहार, याबाबत होणाऱ्या फसवणुकीबाबत माहिती देत घ्यावयाची काळजी, याबाबत मार्गदर्शन केले. या वेळी माहिती देताना संस्थेचे प्राचार्य डॉ. प्रवीण जाधव व विभागप्रमुख नुतन जोशी यांनी सांगितले की, महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी जुन्नर, पारनेर तालुक्यातील शाळा -कॉलेज, महिला बचतगट, बसस्थानकावर जाऊन सायबर सुरक्षितेबाबत जनजागृती केली. या उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, खजिनदार व विषय शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.